# इंदिरा ते निर्भया...!

इंदिरा ते निर्भया ह्या विषयाकडे बघताना मुळात, हे दोन नुसतेच व्यक्तिमत्व म्हणून नाही तर ह्यांचा रूपक स्वरुपात अभ्यास झाला पाहिजे. भारताच्या इतिहासातील ह्या महत्वपूर्ण घटना आहेत. मी ह्यांना घटना म्हणून संबोधले आहे कारण इंदिराने *system* चा बळी घेतला आणि दुसर्या घटनेत *system* ने व्यक्तीचा बळी घेतला. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या *India's Daughter* हा माहितीपट जर्मनीत बघताना राग, चीड, संताप, दया, आणि एक माणूस म्हणून आणि त्याहून अधिक एक भारतीय नागरिक म्हणून, आपली उत्क्रांती खरच होतीये का, आणि जर होतेच आहे तर कुठल्या दिशेने असे प्रश्नांचा वादळ उठणं फारच स्वाभाविक होतं. ज्या देशाच्या राजधानीत काही दशकांपूर्वी एक स्त्री, राष्ट्रीयच नाही तर आंतरराष्ट्रीय राजकारण, आपल्या बेधडक नेतृत्वाने हादरवून सोडते आणि अख्या देशाला निडर, निर्भय आणि क्रूर पण स्वतःचं अस्तित्व टिकवण्यासाठी गरजेचा असलेला निर्णय घेऊन, आणीबाणी लागू करून, वेठीस धरते. त्याच भूमीत, त्याच राजधानीत, आधुनिक भारतात, एक्विसाव्या शतकातील महाशक्ती होऊ पाहणाऱ्या आपल्या देशात आजच्या इंदिरावर अतिप्रसंग यावा, नुसताच अति नाही तर अमानुष अतितीव्रप्रसंग यावा हि एक लांचानास्पद गोष्ट आहे. आणि एक भारतीय म्हणून मला ह्याची लाजच नाही तर घृणा वाटते. सत्ताकेंद्रात झालेले हे प्रकार, हा फक्त एक विषय नसून, राजकीय आणि सामाजिक वास्तववादी चित्र मांडणारा प्रवास आहे. ह्या चित्राने आपल्या वैचारिक पातळीवर, विवेकावर फार कठोर प्रश्न उपस्थित केलेले आहे. सर्वच कठीण प्रसंगांचा आणि एकंदरीतच आपल्या सामाजिक व्यवहाराचा, आपण विचार केला पाहिजे. आपण आपला लोलक, जाणिवांचा, सावेदान्शिल्तेचा, आत्म्याचा लोलक, एकदा का होईना पण तपासून पहिला पाहिजे. हरवला असेल तर शोधला पाहिजे. आणि जर नसेलच मुळात तर योग्य तत्वांनी, चांगल्या वाचनाने, चांगल्या क्रीयांने तो गुंफला पाहिजे तो घडवला पाहिजे.

-गौरव कोठारी